**B.Com. Part-I (Semester-II) (Old) Examination**

**MARATHI**

**(Optional Languages)**

वेळ : 3 तास] [गुण : 80

139

1. माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांच्या व्यक्तिमत्वाच्या विविधांगी पैलुचा आठावा घ्या.

**किंवा**

"मी नीच आहे!'' या पाठातून कोणते विचार मांडले आहेत ? ते लिहा. 10

2. डॉ. आ.ह. साळुंखे यांच्या मते 'स्वातंत्र्य' या तत्वाचे महत्व विशद करा.

**किंवा**

'सारे युग वार पाहते आहे।' या पाठातून लेखकाने गुलामी बद्दल काय सांगितले आहे ? 6

3. सावजी महाराजांनी जीवनाच्या कोणत्या शाश्वत बाजू आहेत ? ते कसे पटवून दिले ? ते सांगा.

**किंवा**

'पीळ' या कथेद्वारे आईच्या मनाची धालमेल अधोरेखीत करा. 10

4. 'महालूट' कथेद्वारे शेतकऱ्यांच्या शोषणाचे चित्रण करा.

**किंवा**

दोन पिठयातील भावनिक संघर्ष 'अवधत' या ग्रामीण कथेद्वारे चित्रीत करा. 6

5. 'जखम' या कवितेचे रसग्रहण करा.

**किंवा**

'अदयाप' या कवितेचा आशय स्पष्ट करा. 10

6. 'सावज' या कवितेतून कावेबाज मानसांच्या वृत्तीचे चित्रण करा.

**किंवा**

देण' कवितेतील नाते संबंधाचे विविध पदर उलगडून सांगा. 6

7. तक्रारपत्र म्हणजे काय ? सांगून तक्रारपत्राचा नमूना तयार करा.

**किंवा**

कार्यालयीन पत्रव्यवहाराचे महत्व सांगून कार्यालयीन पत्रव्यवहाराचे स्वरूप, वैशिष्ट्ये सांगा. 10

8. खालील उत्तारा वाचून त्याचा आशय लिहा :

ऐतिहासिक दृष्टया 'दलित साहित्य' ही संकल्पना, प्रत्यक्ष स्वतंत्र प्रवाह साहित्य संबोधणे योग्य नसून त्या ऐवती 'आंबेडकरी साहित्य' हे नाव दयावे या भूमिकेत युक्तिवाद आहे. पण इतिहास आपण कसा पुसणार ? शिवाय 'दलित पण' जोपासण्यासाठी दलित साहित्याची निर्मिती नसून ते संपविण्यासाठी त्यांचा उदय आहे, हा ताजा इतिहास असेल तर ही 'दलित' शब्दाची ऐतिहासिकता नाकारव्याची गरज काय आहे ? हा प्रश्न शिल्लक राहतो. शिवाय नाव कोणते ही दिले तरी त्या साहित्यातील जाणिवांचा परिध आणि खोली किती प्रमाणात वाढली यावरच त्या प्रवाहाचे भवितव्य अवलंबून आहे !

'दलित साहित्य' आणि आंबेडकरी साहित्य या संकल्पनेची फलपुती, शोषण व्यवस्थेचे सर्व पदर निकाली काढण्याचा व्यापक समतावादी जाणिवेच्या अभिव्यक्तीत घडावी ! त्यासाठीच आंबेडकरी विचार-प्रवाहातील व आंबेडकरी भूमिकेच्या मर्यादांची जाणिव ठेवून 'नव-आंबेडकरी वादाच्या' दिशेने चिंतन आणि साहित्य व्यवहार आवश्यक आहे. 'नव-आंबेडकरीवाद' हा नवा मार्क्स, नवा गांधी, नवा-बुद्ध, नवा आगरकर यांच्याशी संवादी राहून सेक्युलॅरिझमचे सामर्थ्य पचवतो. या पार्श्वभूमीवर 'आंबेडकरी साहित्य' ही संकल्पना सुद्धा, संपूर्णत: निर्दोष मानता येत नाही.

(डॉ. श्रीपाल सबनीस)

**किंवा**

खालील दिलेल्या इंग्रजी भाषेतील उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा :

In a private bank, secrecy is maintained and one of the examples is that in Swiss banks, accounts are opened by using numbers. Also, the private banks and clients use many levels of privacy to hide accounts and transactions. They open up shell companies to hide the identity of the owner of the bank account and also open up accounts in code names. 6

9. वस्तुनिष्ठ प्रश्नांची अचूक उत्तरे लिहा :

(1) सेनापती बापरांना सारा महाराष्ट्र काय म्हणून शिरावर घेणार होता ?

(अ) आचार्य (ब) योगाचार्य

(क) भीष्माचार्य (ड) दृठाचार्य

(2) 'स्वाधीन' बुद्धीचा गौरव कोणी केला ?

(अ) तुकाराम (ब) ज्ञानेश्वर

(क) एकनाथ (ड) नामदेव

(3) 'माझ्या गावी आजही मुळींसाठी माध्यमिक शाळा नाही.' हे वाक्य कोणाचे आहे ?

(अ) सावित्रीबाई फुले (ब) मलाला

(क) ताराबाई (ड) पर्तीबाताई

139 139 139 139 139

(4) मलाला युसुफझई यांना कोणत्या वर्षीचा नोबेल शांतता पुरस्कार मिळाला ?

(अ) 2012 (ब) 2016

(क) 2018 (ड) 2014

(5) सी.व्ही. रमन यांना ............ पुरस्कार मिळाला होता.

(अ) पद्‌मश्री (ब) भारतरत्न

(क) पद्‌मभूषण (ड) नोबेल

(6) बी.ए. नंतर आपल्याला कोण शिकू देणार नाही यांची खात्री होती?

(अ) काका (ब) अन्याजी

(क) आई (ड) भाऊ

(7) को. ऑपरेटिव्ह बॅंक कोणचा गायवाळा आहे ?

(अ) सावकारांचा (ब) शेटजींचा

(क) पाटलांचा (ड) भटजींचा

(8) दिंडीतल्या सर्व हालचालीवर कोणाचे बारीक लक्ष असे ?

(अ) सावजी महाराज (ब) गणपत

(क) कौशल्या (ड) विठ्ठल

(9) 'सावज' या कवितेचे कवी कोण ?

(अ) स.ग. पाचपोळ (ब) उषाकिरण आत्राय

(क) प्रभा गणोरकर (ड) नारायण कुळकर्णी

(10) खालीलपैकी कोणती कविता जयराम खेडेकरांची आहे ?

(अ) देण (ब) अदयाप

(क) जखम (ड) माय

(11) निधनो .............. जेव्हा आपण.

(अ) गावाळा (ब) प्रवासाला

(क) शाळेला (ड) शेताला

(12) समनेसाठी काय आली आहे असे कवी म्हणतो ?

(अ) राजेशाही (ब) हुकुमशाही

(क) लोकशाही (ड) भांडवलशाही

(13) तक्रारपत्रातील भाषा कसी असू नये ?

(अ) सुलभ (ब) आक्रमक

(क) मवाळ (ड) कठीण

(14) आशय लेखनात उत्तारा .............. घ्यावा लागते.

(अ) समजून (ब) लिहून

(क) पाहून (ड) वरील सर्व

(15) व्यवहारामध्ये स्पष्टता येण्यासाठी कशाची गरज असते ?

(अ) विचारांची (ब) मोबाईलची

(क) पत्रलेखनाची (ड) भाषेची

(16) भाषांतरासाठी कमीत-कमी किती भाषेचे ज्ञान असावे लागते ?

(अ) चार (ब) एक

(क) पाच (ड) दोन 1×16=16

139 139 139 139 139